महाराष्ट्र शासन
वन विभाग

# उप वनसंरक्षक, पुर्व भाग, नाशिक यांचे कार्यालय,

शरणपूर पोलीस चौकी समोर, त्र्यंबक रोड नाशिक 422 002
E-Mail :- dycfnashikeast@mahaforest.gov.in
फोन नंबर 0253-2572775

जा.क्र.कक्ष-3/जमीन/सटना-मंगरूळ रस्ता/ 1501 / नाशिक दिनांक 07 सप्टेंबर 2023

प्रति,
कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग,
नाशिक.

**विषय** :- वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत सटाणा मंगरूळ या रस्त्याचे कामासाठी 6.3912 हे वनजमिन वळतीकरण करणेकामी मंजूरी मिळणेबाबत

**सदर्भ** :-
1) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.कक्ष-3/जमीन/OAFटाणा-मंगरूळ 6.3912 हे./479/दि.17/8/2023.
2) मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा) नाशिक यांचे पत्र जा.क्र.कक्ष-2/जमीन/प्र.क्र.25/1459/दि.1/9/2023.

उपरोक्त संदर्भिय मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा) नाशिक यांचे पत्राची छायोकीत प्रत तसेच मुळ प्रस्ताव माहिती तथा आवश्यक कार्यवाहिसाठी यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तरी उपरोक्त मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा) नाशिक यांचे पत्रात नमुद त्रुट्यांची पुर्तता करून सुधारीत व परिपुर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा म्हणजे त्याबाबत पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल.

**सहपत्र** :- वरील प्रमाणे

(उमेश वावरे) भा.व.से.
**उप वनसंरक्षक पुर्व भाग**
**नाशिक**

**प्रतिलीपी** :- वनपरिक्षेत्र अधिकारी देवळा (प्रा) व वनपरिक्षेत्र अधिकारी चांदवड (प्रा) यांना सहपत्रासह माहिती तथा आवश्यक कार्यवाहिसाठी.

2/- त्यांनी सहपत्रातील मुद्दा क्र.1 चे पुर्ततेसाठी वृषांची यांदी,गोषवारा,वृक्षांची वेढीवार यादी,तसेच वृक्षतोड खर्चाचे अंदाजपत्रक आंग्ल भाषेमध्ये (In English) तयार करून ते तांत्रीक व प्रशासकीय मान्यतेसह या कार्यालयास उलट टपाली सादर करावे.

महाराष्ट्र शासन
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक यांचे कार्यालय.
जुना आग्रा रोड, अरण्य संकुल, आदिवासी विकास भवन समोर, नाशिक ४२२ ००२.
दूरध्वनी क्र.०२५३-२५९८५४५. ई-मेल- ccfnashik२०१२@gmail.com


जा.क्र. :कक्ष-2/जमिन/प्र.क्र.25/2022-23/ 1459 /सन 2022-23 दिनांक :-31 /08/2023

**ज्ञापन**

विषय :- **वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत सटाणा मंगरुळ या रस्त्याचे कामासाठी 6.3912 हेक्टर वनजमिन वळतीकरण करणेकामी मंजुरी मिळणेबाबत**

संदर्भ :- उप वनसंरक्षक पुर्व भाग नाशिक यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-3/जमीन/ Satana to Mangrul 6.3912 ha./ 479/, दिनांक 17/08/2023

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करता खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1) प्रस्तुत प्रस्तावाअंतर्गत 975 वृक्षांची तोड होणार असलेबाबत वृक्षांची यादी, गोषवारा, वृक्षांची वेढीवर यादी तसेच वृक्षतोड खर्चाचे अंदाजपत्रक पृष्ठ क्रमांक 135 ते 178 वर मराठी भाषेमध्ये जोडलेली आहे. सदरचा प्रस्ताव वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत कलम 2 नुसार केंद्र शासनाचे मंजुरीसाठी सादर करायचा असल्याने उपरोक्त कागदपत्रे आंग्ल भाषेमध्ये (English) तयार करुन प्रस्तावामध्ये जोडावीत.
2) केंद्र शासन मार्गदर्शक सुचना दि.05/07/2013 अन्वये अनुसूचित जमाती व ईतर पारंपारीक वननिवासी कायदा 2006 (FRA 2006) बाबतचे विहित नमुन्यातील जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र प्रस्तावामध्ये जोडलेले नाही. प्रकरणी सदरचे प्रमाणपत्र किंवा प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र प्रस्तावामध्ये जोडण्यात यावे.
3) प्रस्तावावर नमुद पृष्ठ क्रमांक अचुक व स्पष्ट नमुद करुन प्रस्ताव सादर करावा.

संदर्भिय पत्रान्वये प्राप्त प्रस्ताव चार प्रतीत सोबत जोडुन पाठविण्यात येत आहेत. वरीलप्रमाणे बाबींची पुर्तता करुन सुधारीत प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह तसेच परिवेश पोर्टलवर सर्व बाबींची पुर्तता झालेली आहे याबाबत खात्री करुन सादर करावा.

(ऋषिकेश रंजन)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
नाशिक

सोबत :- वरीलप्रमाणे

प्रति,
उप वनसंरक्षक, पुर्व भाग नाशिक